जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2026
लोकमत

नाटकामधील संवादाइतकीच प्रकाशयोजना महत्त्वाची : चव्हाण

शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : नाटकातील संवाद जितके महत्त्वाचे असतात, तितकीच प्रकाशयोजनाही महत्त्वाची असते. प्रकाशयोजना ही केवळ रंगमंच उजळवण्यासाठी नसून नाटकातील पात्रांच्या भावभावना, प्रसंगांची खोली आणि आशय प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते, असे प्रतिपादन प्रकाश-योजनाकार श्याम चव्हाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित दोन दिवसीय प्रकाशयोजना कार्यशाळेत ते बोलत होते. विद्यार्थी व नाट्यप्रेमींना प्रात्यक्षिकांसह प्रकाशयोजनेतील तांत्रिक व कलात्मक बारकाव्यांचे मार्गदर्शन केले.

रंगमंचाचा कोणता भाग प्रकाशात आणायचा आणि कोणता भाग अंधारात



शिवाजी विद्यापीठाच्या कार्यशाळेत श्याम चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

ठेवायचा, याचे भान प्रकाश योजनाकाराला असणे आवश्यक आहे, असे चव्हाण यांनी सांगितले. प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्तविक केले. किरण चव्हाण व रविदर्शन कुलकर्णी समन्वयक होते. विशाखा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेला जयसिंग पाटील, आमोद पटवर्धन, पी. डी. कुलकर्णी, अनमोल कोठडिया उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2026

लोकमत

भारती विद्यापीठ फार्मसीला 'उत्कृष्ट अ' श्रेणी प्राप्त

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामार्फत केलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय तपासणीत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाला 'उत्कृष्ट अ श्रेणी' प्राप्त झाली आहे.

महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता क्रमवारीतही उल्लेखनीय यश मिळविले आहे. भारतीय गुणवत्ता परिषद, नवी दिल्ली यांच्या नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंगमार्फत जाहीर केलेल्या 'महाविद्यालयांची क्रमवारी व गुणवत्ता मूल्यांकन-२६'मध्ये पदवी अभ्यासक्रमाने राष्ट्रीय स्तरावर सहावा, तर पदविका अभ्यासक्रमाने १७वा क्रमांक मिळविला आहे. दोन्ही अभ्यासक्रमांना 'ए' श्रेणी प्राप्त झाली. डॉ. विश्वजित कदम, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. अस्मिता जगताप यांनी प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एम. एस. भाटिया, आदींचे अभिनंदन केले. (वा.प्र.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2026
लोकमत

भारती विद्यापीठ फार्मसीला 'उत्कृष्ट अ' श्रेणी प्राप्त

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामार्फत केलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय तपासणीत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाला 'उत्कृष्ट अ श्रेणी' प्राप्त झाली आहे.

महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता क्रमवारीतही उल्लेखनीय यश मिळविले आहे. भारतीय गुणवत्ता परिषद, नवी दिल्ली यांच्या नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंगमार्फत जाहीर केलेल्या 'महाविद्यालयांची क्रमवारी व गुणवत्ता मूल्यांकन-२६'मध्ये पदवी अभ्यासक्रमाने राष्ट्रीय स्तरावर सहावा, तर पदविका अभ्यासक्रमाने १७वा क्रमांक मिळविला आहे. दोन्ही अभ्यासक्रमांना 'ए' श्रेणी प्राप्त झाली. डॉ. विश्वजित कदम, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. अस्मिता जगताप यांनी प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एम. एस. भाटिया, आदींचे अभिनंदन केले. (वा.प्र.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2026

पुढारी

शिवाजी विद्यापीठात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शासनाच्या उपक्रमांतर्गत 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. 'वंदे मातरम्' गीताच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'समग्र वंदे मातरम् खंड एक : इतिहास' या पुस्तकातील मजकुराचे मूक वाचन अधिविभागाच्या शाहू कक्षात करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माहितीपर भित्तीपत्रिकेचे उद्घाटन शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे आणि श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ. टी. बी. नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील व अतुल जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन व आभार प्रदर्शन कादंबरी खांडेकर यांनी केले. यावेळी बी.एड., एम.एड., एकात्मिक एम.एड. तसेच बी.एस्सी.-बी.एड. (आयटीईपी) अभ्यासक्रमांचे विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2026

लोकमत

शिवाजी विद्यापीठात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'वाचन प्रेरणा दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात "वाचाल तर वाचाल! वाचन संस्कृती जोपासूया, ज्ञानसमृद्ध समाज घडवूया" असा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुहासिनी पाटील, डॉ. डी.बी. सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रिया देशमुख, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते. डॉ. सुतार यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद सबनीस लिखित समग्र वंदे मातरम् खंड, एक इतिहास पुस्तकातील निवडक भागाचे वाचन करण्यात आले. डॉ. कबीर खराडे यांनी आभार मानले.